ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 5 | JANUARY - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सत्याग्रहाविषयी विचार



**प्रा.किशोर धोंडीबा थोरे**

**सहा. प्राध्यापक , सी.बी.खेडगीज् बी.सायन्स, आर.व्ही.कॉमर्स ॲण्ड आर.जे आर्टस कॉलेज, अक्कलकोट , जि. सोलापूर.**

## प्रस्तावना:-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यता निवारण करण्यासाठी अनेक महत्त्वपुर्ण विचारावर विचार मंथन केले आहे. अस्पृश्यता निवारण करण्यासाठी सत्याग्रह करावा लागेल असे त्यांचे मत होते.पण तो सत्याग्रह कशा प्रकारचा असावा यांसंबंधी आंबेडकरांची एक वेगळी विचारधारा होती. कारण १९१५ नंतर महात्मा गांधीजीचा भारतीय राजकारणात प्रवेश झाला होता. गांधीजीनी स्वातंत्र्यसंग्राम सर्वसामान्यांपर्यंत पोहचविला. गांधीजीचा सत्याग्रह विषयी विशिष्ट विचारधारा होती. गांधीजीनी आपल्या आयुष्यात अनेक सत्याग्रह चळवळी केल्या याच सत्याग्रहाचा भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी मदतही झाली. गांधीजीच्या या सत्याग्रह पध्दतीला आज गांधीवाद म्हणून ओळखले जाते. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सत्याग्रह व गांधीजीचा सत्याग्रह यामध्ये फरक असल्याचे दिसून येते. डॉ. आंबेडकरांनीही आपल्या आयुंष्यात अनेक सत्याग्रह केले. तरीही आपणाला सत्याग्रह म्हटले की फक्त गांधीजीचाच सत्याग्रह आठवितो. गांधीजीचा सत्याग्रह हा आदर्शवादावर आधारित आहे. परंतु आंबेडकरांचा सत्याग्रह हा वास्तववादावर आधारित आहे. या दृष्टीकोणातून आंबेडकरांच्या सत्याग्रहाचा अभ्यास करण्याची गरज आहे.

## सत्याग्रह म्हणजे काय?

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृशासाठी सत्याग्रहाचा मार्ग सांगितलेला आहे. परंतू सत्याचा आग्रह धरणे म्हणजेच फक्त सत्याग्रह नाही तर सत्याग्रहाचा खूप गहण अर्थ आहे. एखादा सत्याग्रह करीत असताना त्याचे यश साधनसामुग्रीच्या प्रमाणावर जितके आवलंबून आहे तितकेच ते त्या कार्याच्या नैतिक स्वरुपावरही आवलंबून आहे. कार्याच्या मुळाशी जर सत्य असेल तर त्यात यशप्राप्ती होण्यास चिंता करण्याचे कारण उरत नाही. कारण अखेर सत्यांचा नेहमीच विजय होत असतो. त्याचप्रमाणे त्या कार्याच्या मुळाशी असत्य असेल तर त्या कामासाठी यशप्राप्ती कठीण असते. असे डॉ. आंबेडकराचे मत होते.

सत्याग्रहाच्या बाबतीत एक गोष्ट महत्त्वपुर्ण असेते ती म्हणजे सत्य कोणते व असत्य कोणते हे ठरविणे होय. कारण सत्य म्हणजे नेमके काय हेच जर निश्चितपणे ठरविता आले नाही तर सत्याग्रहाची इमारत केव्हाही ढळमळीत राहणार. आपला आग्रह सत्याग्रह आहे की नाही याविषयी जर माणसांची खात्री नसेल तर त्याच्या हातून सत्याग्रह कसा पार पडेल? कारण सत्याग्रहाची यशप्राप्ती नेहमीच सत्याग्रही माणसाच्या आत्मबलावर आवलंबून असते. हे आत्मबल सत्याग्रहीच्या ठायी प्रकट होण्यास आपण जे काम करीत आहे ते सत्य आहे अशी ठाम भावना त्यांची असली पाहीजे. जर ती भावना संशयात्मक असेल तर त्याच्या ठायी सत्याग्रहास आवश्यक असलेले आत्मबल निर्माण होणार नाही. म्हणून सत्य म्हणजे काय याची माहीती सत्याग्रहीस असणे आवश्यक आहे. डॉ. आंबेडकर म्हणतात थोडक्यात सांगायचे म्हणजे ज्या कार्यापासून लोकसंग्रह होत आहे ते सत्कार्य आहे व त्यासाठी केलेला आग्रह त्यास सत्याग्रह म्हणावे. यामध्ये लोकसंग्रहाच्या बाबतीत मतभेद होणे शक्य आहे. एकाला जे लोकसंग्रहाचे कार्य वाटते तेच दुसऱ्याला लोक विग्रहाचे कार्य आहे असे वाटेल. तरीपण एक गोष्ट मान्य करावी लागेल की कर्त्याची बुध्दी जर शुध्द नसेल तर म्हणजेच स्वार्थमुलक हेतुने जर तो कार्य करण्यास प्रवृत्त होत असेल तरच लोकविग्रहाच्या कामाकडे त्याचा कल होईल. तेच कर्त्याच्या मनांत जर समभाव जागृत असेल तर त्याच्या हातुन लोकविग्रहाचे काम मुळीच होणार नाही. कारण स्वार्थाचा ओढा नसल्यामुळे त्याची वासना लोकसंग्रहाकडे असणार म्हणून या दोन तत्वाचा आधार घेऊन जेथे समभाव आहे तेथे लोकसंग्रह

आहे व जेथे लोकसंग्रह आहे तेथे सत्कार्य आहे आणि अशा कार्याविषयी जो आग्रह तो सत्याग्रह होय. अशा पध्दतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सत्याग्रहाची व्याख्या सांगितली आहे.

## सत्याग्रहाची पध्दत:-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारानुसार सत्याग्रह कसा करावा याबद्दलही सविस्तर मार्गदर्शन केले आहे. सत्याग्रहाची पध्दत कशी असावी हे निश्चित झाल्याशिवाय सत्याग्रह करता येणार नाही. महात्मा गांधीजी हे आधुनिक काळातील सत्याग्रह चळवळीचे पुरस्कर्ते म्हणून ओळखले जातात. म.गांधीजीनी सांगितलेला मार्ग हाच सत्याग्रहाचा मार्ग आहे. असा सर्वांचा समज झाल्याचे दिसून येतो. महात्मा गांधीजीच्या मार्गाशिवाय इतर मार्ग असूच शकत नाही असा बहूतेकांचा समज होता.म. गांधीजीच्या सत्याग्रहाच्या मार्गात हिंसेला वाव ठेवलेला नाही. इतकेच नाही तर सत्याग्रहामध्ये हिंसा झाली तर तो सत्याग्रह नव्हे असे गांधीजीची भुमिका होती. गांधीजीच्या असहकार चळवळीमध्ये चौरीचौरा याठिकाणी हिंसा झाल्याचे कळताच गांधीजीनी असहकार चळवळ बंद करण्याचा निर्णय घेतल्याचे आपणाला माहितच आहे. या बाबतीत डॉ. आंबेडकरांचे मत परखड होते. गांधीजीचे हे म्हणने तर्कशुध्द नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. कारण एखाद्या माणसाचा आग्रह सत्याग्रह आहे की दुंराग्रह आहे हे त्या आग्रहाच्या सिध्दिसाठी योजिलेल्या साधनांवर आवलंबून नसते तर ते सर्वस्वी ज्या त्या कार्याच्या नैतिक अधिष्ठानावर आंवलंबून आसतो. सत्याग्रही करीत असलेले कार्य जर सत्कार्य असेल तर त्याबाबतीत धरलेला आग्रहास सत्याग्रह म्हटले पाहिजे आणि तेच जर असत्य असेल तर त्याने त्या बाबतीत धरलेल्याआग्रहास दुराग्रह म्हणावे लागेल. असे आंबेडकरांचे मत होते. हिंसा किंवा अहिंसा ही केवळ आग्रहाच्या सिध्दीची साधने आहेत. जसे कर्माच्या किंवा कर्त्याच्या अनुरोधाने क्रियापदाचे रुप बदलते तसे काही साधनांच्या अनुरोधाने आग्रहाचे नैतिक स्वरुप बदलत नाही. समजा एखाद्या दुराग्रहीने आपला आग्रह पार पाडण्यासाठी अहिंसेचा मार्ग पत्करला म्हणून त्यांच्या दुंराग्रहाला सत्याग्रह म्हणता येणार नाही. त्याचबरोबर एखाद्या सत्याग्रहीने सत्याग्रहाच्या सिध्दीसाठी हिंसा केली एवढयावरुन त्याच्या सत्याग्रहाला दुराग्रह म्हणता येणार नाही. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक उदाहरण सांगतात. महाभारतातील गीतेमध्ये श्रीकृष्णाने अर्जुनास सत्याग्रहाच्या सिध्दीसाठी जो हिंसेंचा मार्ग पत्करण्यास भाग पाडले त्यास काय म्हणाव? त्याला पापात्मा म्हणावे का? असा सवाल आंबेडकरांनी विचारला आहे. सत्याग्रह करीत असताना प्रत्येक ठिकाणी अहिंसा उपयोगी पडेल की नाही हे सांगता येत नाही.समजा आपला जीव घेण्यास अथवा आपल्या पत्नीवर अगर आपल्या कन्येवर बलात्कार करण्यास अथवा आपल्या घरास आग लावण्यास, अगर आपली सर्व दौलत व स्थीरस्थावर हरण करण्यास एखादा दुष्ट मनुष्य शस्त्र घेऊन सज्ज झाल्यास त्यावेळी आपल्या जवळ कोणी त्राता नसल्यास आपण काय कराव? असल्या दुष्ट मनुष्याची आपण अहिंसा परमो धर्म म्हणून डोळे मिटून उपेक्षा करावी की तो सामोपचाराने ऐकत नसल्यास त्यास यथाशक्ती शासन करावे. कोणताही मनुष्य दुसरा मार्ग पत्करल्याशिवाय राहणार नाही. कारण अशा वेळी जो दुष्कर्म करतो त्याला पाप लागते असे आमचे शास्त्र सांगते. प्राचीन शास्त्रकर्त्यांनेच नाही तर आर्वाचिन फौजदारी कायद्यानेही आत्मसंरंक्षणासाठी हिंसा करण्याचा हक्क काही मर्यादा ठेवून कबूल केला आहे. हिंसा करणे जरी अयोग्य असले तरी आत्मसंरंक्षणाचे कार्य त्याशिवाय साधत नसल्यास हिंसा करणे रास्तं आहे असे समजतात.

भ्रुणहत्या म्हणजे कोवळया जीवाची हत्या अति निंदनीय मानली जाते. परंतु तेच पोर आडवे आले तर त्यास कापून काढावयास कोणी हरकत घेत नाही. हाच तर्कवाद सत्याग्रहाच्या सिध्दीस लागू करणे प्राप्त आहे. त्यामुळे सत्याग्रही माणसास हिंसा करावी लागली तर ती क्षम्य आहे. असे कारणपरत्वे म्हणावे लागेल. गांधीजीचा अहिंसात्मक सत्याग्रहाचा मार्ग अशा दृष्टीने पाहिले तर अव्यवहारिक ठरतो. पण ता अहिंसात्मक आहे असे म्हणने देखिल निव्वळ भ्रम आहे. हिंसा करणे म्हणजे हत्या करणे असा जर हिंसेचस संकुचित अर्थ केला तरच हिंसा आणि अहिंसा यांच्यात काही भेद करता येईल. परंतु हिंसा म्हणजे नुसता जीव घेणेच नव्हे तर दुसऱ्या प्राण्याचे मन किंवा शरीर यास इजा करणें याचाही त्यात समावेश होतो. अहिंसा म्हणजे कोणाही सचेतन प्राण्यास न दुखविणे होय. असा जर हिंसा या शब्दाचा व्यापक अर्थ घेतला तर म. गांधीजीची अहिंसा ही एकप्रकारची हिंसाच आहे. असे डॉ. आंबेडकरांचे मत आहे. त्याचे कारण सांगताना आंबेडकर सांगतात, म. गांधीजीच्या सत्याग्रहाची जी रीत आहे त्यामुळे इतर प्राण्यांच्या जरी शरीरावर आघात होत नसला तरी त्यांचे मन दुखावले जाते याबद्दल काही शंका नाही.

## सत्याग्रह कोणाविरुध्द करावयचा?

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सत्याग्रह कोणाविरुध्द करावा याविषयी आपली भुमिका मांडलेली आहे. आंबेडकरांची चळवळ ही दलित चळवळ होती. त्यामुळे हे आंदोलन स्पृश्य लोकांविरुध्द आहे असे म्हणावे लागेल परंतु डॉ. आंबेडकरांची भुमिका वेगळी होती. आंबेडकर म्हणतात, समजा उद्या अस्पृश्य लोक एखाद्या सार्वजनिक तळयावर अथवा एखाद्या सार्वजनिक देवालयांत आपले हक्क बजाविण्याचा आग्रह धरून गेले, व स्पृश्य लोक त्यांना प्रतिकार करण्याच्या हेतु आडवे आले. तर पुढे काय होणार हा प्रश्न विचारात घेतल्याशिवाय सत्याग्रह कोणाविरुध्द करावयाचा आहे याचा पुर्णपणे समज होणे शक्य नाही. अस्पृश्य लोक सत्याग्रहास प्रवृत्त झाले आणि आपेक्षिलेप्रमाणे जर स्पृश्य लोक आडवे आले आणि त्यांच्या अपकृत्यामुळे शांततेचा भंग होण्याचा जर रंग दिसून आला तर शांतता राखण्यासाठी सरकारला या लढयात पडावे लागेल. कारण शांतता राखणे हे सरकारचे मुळ कर्तव्य आहे. आणि जर सरकार या लढयात पडले तर ते कोणते धोरण स्विकारील हे जाणून घेतल्याशिवाय सत्याग्रह कोणाविरुध्द करावयाचा हे ठरविणे अशक्य आहे. सरकारने जर अस्पृश्यांची

बाजू घेतली आणि न्याय हक्काची अंमलबजावणी करणाऱ्या लोकांस सरकारच्या दिर्घ बाहूची मदत देणे हे न्याय आहे. व त्या न्यायाप्रमाणे सरकार वागले तर हा प्रश्न चुटकीसरशी सुटून जाणार आहे. परंतु तसे न होता सरकारने जर उलट खाल्ली व सत्याग्रही अस्पृश्यांनाच ते म्हणू लागले की, तुम्ही नव्यानव्या क्लृप्त्या काढून भलभलत्याच गोष्टी करु लागलात तेणेकरुन शांततेचा भंग होत आहे. सबब तुम्हास मनाई करतो असा हुकूम सरकारने काढला तर अस्पृश्यांना जो सत्याग्रह करावा लागणार आहे तो दिसावयास जरी स्पृश्याविरुध्द आसला तरी अखेर तो सरकारविरुध्द होणार आहे, हे उघड आहे. याचाच अर्थ सत्याग्रह करीत असताना आपल्यासमोर कोण आहे याचा विचार करुण त्यांच्या विरोधामध्ये सत्याग्रहीना लढावे लागते.

## सत्याग्रह कोणी करावयाचा?

सत्याग्रह कोणाविरुध्द करावयाचा हे ठरल्यानंतर हा सत्याग्रह कोणी करावयाचा याचाही विचार डॉ. आंबेडकरांनी केलेला आहे. त्याविषयी ते म्हणतात, सत्याग्रह हा आपले मानवी हक्क प्राप्त करुन घेण्याचा उपाय आहे. तो उपाय फलदायी होण्यास जेवढया म्हणून अस्पृश्य वर्गातील स्त्री पुरूषास त्यामध्ये सहभाग नोंदविता येईल त्या सर्वांनी त्यात भाग घेणे हे हा सत्याग्रह यशस्वी होण्याचा सर्वात चांगला मार्ग आहे. परंतु आमच्या मते सत्याग्रह हा फक्त व्यवहारिक उपाय आहे इतकेच नसून तो एक प्रकारची आत्मशुध्दी करून घेण्यास आरंभिलेला यज्ञ आहे. या यज्ञात प्रत्येक अस्पृश्याने उडी टाकून आपणास शुध्द करून घ्यावे. स्पृश्य लोक अस्पृश्य लोकांस अपवित्र व अशुध्द मानतात ही गोष्ट जितकी खरी आहे तितकीच अस्पृश्य लोक आपणास स्वतःस अपवित्र व अशुध्द मानून वागतात ही गोष्ट खरी आहे. आतापर्यंत स्पृश्य लोकांचे वर्चस्व प्रस्थापित झाल्यामुळे ते सांगतिल ते करण्याची आणि वागवतील तसे वागण्याची अस्पृश्य लोकांना सवय लागली आहे. स्पृश्य लोक श्रेष्ट आहेत आपण कनिष्ट आहोत, ते आपले नायक आहेत आपण त्यांचे किंकर आहोत या भावनेचे भूत जे अस्पृश्य लोकांच्या मनावर बसून गेलेले आहे. त्यामुळे अस्पृश्यता टिकून राहिलेली आहे. हे भूत काढून फेकल्याशिवाय आत्मसन्मानाची भावना अस्पृश्य लोकांत जागृत होणार नाही. व ती जागृती झाल्यशिवाय अस्पृश्यता निवारण होणार नाही. या आत्मशुध्दीच्या दृष्टीने प्रत्येक अस्पृश्याने या सत्याग्रहात भाग घेणे जरूरीचे आहे. या सत्याग्रहात मोठया संख्येने सहभाग नोंदविणे गरजेचे आहे तर त्यामध्ये यश मिळू शकते. कारण आपला लढा खुप मोठया समूदायाबरोबर आहे त्यामुळे या लढयामध्ये प्रत्येकांनी सहभाग नोंदविलाच पाहिजे.

## निष्कर्ष:-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत आसणारा सत्याग्रह खुप महत्त्वपूर्ण आसल्याचे आपणास दिसून येते. सत्याग्रह म्हटला की आपणाला महात्मा गांधीजी यांचा सत्याग्रह आठवितो. परंतु गांधीजी इतकाच किंबहूना जास्त सत्याग्रह आंबेडकरांना करावा लागला. या दोन्ही सत्याग्रहीमध्ये आंबेडकर हे वास्तववादी सत्याग्रही व गांधीजी आदर्शवादी सत्याग्रही आसल्याचे दिसून येते. गांधीजीनी सत्याग्रह करीत असताना अहिंसेला प्राधान्य दिल्याचे दिसून येते परंतु डॉ. आंबेडकरांना मात्र ही अहिंसा मान्य नसल्याचे दिसून येते. त्याची कारणमिमांसाही आंबेडकर उदाहरणासहीत करतात. त्यामुळे ती पटण्यासारखी आहेत. सत्याग्रह करीत असताना तो सत्याग्रह कोणाविरूध्द करावयाचा याचा विचार सर्वप्रथम करावा लागतो त्यानंतर अहिंसा या मार्गाचा आवलंब करावा की नाही याचा विचार करता येतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सत्याग्रह कोण करावयाचे, कोणाविरूध्द करावयाचा हे ठरविल्याशिवाय मार्ग ठरविता येत नाही असे विचार मांडलेले दिसून येते. आपल्या हक्क मिळविण्यासाठी आपण हिंसेचा मार्ग स्विकारावा लागला तरी हरकत नाही. त्यावेळी हिंसा या शब्दाचा अर्थ फक्त जीव घेणे असा त्याचा अर्थ होत नाही तर वेगवेगळया प्रकारे मनावर होणारेही आघातही हिंसेमध्ये गृहीत धरावे लागेल. याचा विचार करता असे लक्षात येते की कोणताच सत्याग्रह हा अहिंसक असू शकत नाही असे डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे मत होते. थोडक्यात डॉ. आंबेडकराचा सत्याग्रह हा गांधीजीच्या सुप्रसिध्द सत्याग्रहापेक्षा वेगळा व वास्तववादी आसल्याचे दिसून येतो.

## संदर्भ ग्रंथ:-

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बहिष्कृत भारत अंक दि. २५ नोव्हेंबर १९२७
२. सिंगारे अनिल, इतिहासकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर
३. सबे रावसाहेब, आंबेडकर तत्व आणि व्यवहार
४. कांबळे अरुण, धर्मांतराची भीमगर्जना
५. मनोहर यशवंत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ
६. मून वसंत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर राइटिंग ॲण्ड स्पिचेस खंड ३
७. कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र